# 1st Preliminary Examination

## Marathi

**Time : 3 Hrs.** **(Pages 4)** **Marks : 80**

**प्र.१ खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा : १२**

१. दिनू आणि दामू परस्परांच्या कोणत्या तक्रारी आईजवळ करीत आहेत ?
२. से. ले. राणे यांनी सुरुंग निकामी करण्यासाठी कोणते साहस केले ?
३. 'जीवनसंग्राम' या पाठातून हरिहरराव सोनुले यांचे कोणकोणते गुणविशेष दिसून येतात ?
४. आपला मुलगा पास झाल्याचा आनंद आक्का का व्यक्त करत नव्हती ?
५. पी.टी.च्या तासासाठी लागणा-या पॅन्टशर्टची गरज कशी भागविली गेली ?

**प्र.२ (क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : ४**

१. मायमराठीचा पाळणा म्हणण्यासाठी कोण-कोण आले होते ?
२. बहावा आणि चिनार वृक्ष बघताना लेखकाला काय वाटते ?
३. ग्यानबा अमीरच्या वडिलांकडे कशाप्रकारचे काम करीत ?
४. घराने ज्योत्स्ना कदम यांच्या कुटुंबाला काय काय दिले ?

**(ख) पाठ्य-पुस्तकातील गद्यपाठांच्या आधारे खालील वाक्यांतील रिकाम्या जागी योग्य शब्द भरून ती वाक्ये पुन्हा लिहा : ३**

१. रात्रीची भांडी घासायला ............... आली.
२. मी बेलिफांकडून कोर्टाचा आदेश आणि ............ घेतली.
३. जगात पैसा फार वाईट ............. आहे.

**(ग) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते लिहा : ३**

१. "माझी सर्वात धाकटी मुलगी तुमच्या वयाची असेल."
२. "आजपासून तू रोज शेळ्या चारायला माळावर जा."
३. "बरोबर काय न्यायचे आहे ?"

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा :१२**

१. गुरूचे माहात्म्य संत ज्ञानेश्वर यांनी कसे वर्णन केले आहे ?
२. रणांगणावर जाणा-या मुलाच्या आईच्या भावना 'निरोप' या कवितेतून कशा व्यक्त झाल्या आहेत ?
३. 'तहान' या कवितेत कवी आपल्या इच्छा पूर्ण होण्यासाठी स्वतःमध्ये कोणते बदल घडवू इच्छितात ?



SAMPLE

४. 'कसं चालेल ?' असा प्रश्न कवी कोणकोणत्या संदर्भात करतात ?
५. 'शब्दशस्त्र' या कवितेत कवयित्रीने शब्दांचे महत्त्व कसे पटवून दिले आहे ?

**प्र.४ (क) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा संदर्भासह अर्थ लिहा : ३**

१. 'न्याय, नीतीसाठी शस्त्र व्हावे वाणी
साखरपेरणी न ये कामा'

२. 'उर्मी मनात बांधून रोज बाळगावी आस'
भेगाळलेल्या जमिनीला द्यावा श्वासातला श्वास

**(ख) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा : ३**

१. नाम घेताना काय पाहण्याची गरज नाही ?
२. कवीकडे कोणती खेळणी नव्हती ?
३. कशाचा सोहळा साजरा करावा असे कवीला वाटते ?

**प्र.५ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ४० ते ५० शब्दांत लिहा :८**

१. जूलियाचे व्यक्तिचित्र 'काचेची किमया' या पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत रेखाटा.
२. आजोबांनी दिलेले फूल आजीला दिल्यावर आजीने काय केले ?
३. गणपा रावसाहेबांकडे कशासाठी आला होता ?
४. प्रीतमच्या घरच्या परिस्थितीचे वर्णन माधुरी शानभाग यांनी कसे केले आहे ?

**प्र.६ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे १५० शब्दांत निबंध लिहा : १०**

१. **निसर्ग एक गुरू :**
**मुद्दे :** मानवाचे निसर्गाशी नाते - निसर्गाची सुंदरता - निसर्गातील विविध घटक - त्यांच्याकडून मिळणारा संदेश - मानवाची मदत - निसर्गाचा कोप - मानवाचे कर्तव्य.

२. **माझे आजोबा :**
**मुद्दे :** वर्णन - व्यवसाय - दिनक्रम - आजोबांचा सहवास - अनुभव कथन - शिकवण - छंद - विचारसरणी - आजोबांचे जीवनातील स्थान.

३. **एका अपंग व्यक्तिचे आत्मवृत्त :**
**मुद्दे :** अपंगत्व केव्हा व कसे ? - आईसमोर आव्हान - शाळेत जाणे - मुलांचे चिडवणे - लोकांकडून मिळणारी सहानुभूती - मनातील जिद्द.

४. **सूर्य मावळलाच नाही तर .... :**
**मुद्दे :** कल्पना मनात कशी आली ? - कालचक्र थांबेल - होणारे परिणाम, दुष्परिणाम - अशा वेळेस तुम्ही काय कराल ? - ही कल्पना योग्य की अयोग्य.

SAMPLE

**प्र.७ (क) कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून शब्द पुन्हा लिहा (कोणतेही चार) :** **२**

१. **स्त्रीलिंगी रूपे लिहा :**

१. मोर २. पाटील ३. डबा

२. **पुल्लिंगी रूपे लिहा :**

१. नात २. सेविका ३. सुतारीण

**(ख) कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यात बदल करून वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही दोन) : २**

१. नुसत्या हरभ-यासाठी कोण यायला बसलंय आपल्याकडे ? **(विधानार्थी करा)**

२. अगं, भारा तरी खाली टाक. **(प्रश्नार्थक करा)**

३. सावित्रीबाई फार उदार होत्या. **(उद्‌गारवाचक करा)**

४. माझ्या लोकांच्या वाणीवर मला वसू द्याल का ? **(आज्ञार्थी करा)**

**(ग) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा :** **२**

१. देवू का भडकाऊन एक श्रीमूखात ?

२. अन्त्ययात्रेत त्या अगृभागी चालल्या.

**(घ) खालील वाक्‌प्रचारांचा योग्य वाक्यात उपयोग करून ती वाक्ये पुन्हा लिहा (कोणतीही चार) :** **४**

(भीड धरणे, मनात उर्मी बाळगणे, गावीच नसणे, हमी देणे, झुगारून देणे, मनात तळपट ठेवणे.)

१. वस्तू खराब झाल्यास ती बदलून देण्याचे दुकानदाराने आश्वासन दिले.

२. अन्यायाविरूद्ध बोलताना संकोच बाळगू नये.

३. आपल्या समाजातील अन्यायकारक चालीरीती, रूढी, अंधश्रद्धा आपण टाकून दिल्या पाहिजेत.

४. संकटसमयीदेखील माणसाने आशावादी दृष्टीकोन बाळगला पाहिजे.

५. मनात वाईट विचार ठेवले की माणसे दुरावतात.

६. आपल्याला स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले आहे हे दिनेशला माहित नव्हते.

**प्र.८ (क) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणतीही एक गोष्ट लिहा. शीर्षक देऊन तात्पर्य लिहा :** **४**

१. **मुद्दे :** एक अनाथ स्त्री - एकुलता एक मुलगा - मुलाचे अचानक निधन - पुत्र वियोगाचे दुःख - भगवान बुद्धाकडे धाव - उपाय - ज्या घरी कोणी मेलेला नाही अशा घरातून मूठभर मोह-यांची मागणी - घरोघरी, गावोगावी भटकणे - मृत्यू झाला नाही असे एकही घर न मिळणे - बुद्धाच्या म्हणण्याचा अर्थबोध होणे - तात्पर्य.

२. **मुद्दे :** सिंह, कुत्रा व कोल्हा - मैत्री - शिकार - करार - शिकारीत तिघांचा सारखा वाटा - हरीण दिसले - पाठलाग - सिंहाने ठार मारणे - समान वाटे पण - सिंह नाकबूल - सिंहाचा वाटा -



SAMPLE

कुत्र्याचा व कोल्ह्याचा वाटा - एकट्या सिंहाने ताव मारणे - कुत्रा - कोल्हा - दुबळे - अशक्त - शिकार दाखवूनही त्यादिवशी उपास - बोध.

**(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वतःच्या भाषेत लिहाः**

तो सूर्य पाहा. त्याचे दर्शन म्हणजे परमात्म्याचे दर्शन. तो नाना प्रकारची चित्रे आकाशात रंगवीत असतो. चित्रकार महिनेच्या महिने कुंचले मारून सूर्योदयाची चित्रे रंगवितात. सकाळी उठून जरा पाहा, परमेश्वराची कला. त्या दिव्य कलेला, त्या अनंत सौंदर्याला उपमा तरी देता येईल का ? पण पाहतो कोण ? तिकडे तो सूर्य भगवान उभा राहून म्हणतो, “आळशा, तू निजू पाहशील, परंतु मी तुला उठवणार आहे.” स्थावर जंगमाचा सूर्य हा आत्मा आहे. हा मित्र लोकांना हाक मारतो, त्यांना काम करावयास लावतो. त्याने स्वर्ग-पृथ्वीचे रूप धारण केले आहे. खरोखरच तो सूर्य जीवनाचा आधार आहे. त्याच्या ठिकाणी परमात्मा पाहा.

**प्रश्न :**

१. सूर्याला परमात्मा का म्हटले आहे ? २

२. चित्रकार काय करत असतो ? १

३. सूर्याच्या दर्शनाला कशाची उपमा दिली आहे ? १

**प्र.९ खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा :** ४

१. खेळाचे शारीरिक व मानसिक फायदे सांगणारे पत्र धाकट्या भावाला लिहा.

२. राजेश/रजनी जाधव, १४०, वर्मा नगर, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०६१. येथून मा. श्री. आरोग्याधिकारी, मुंबई महानगरपालिका, अंधेरी (पू.), मुंबई - ४०० ०६१. यांना बेवारशी कुत्र्यांच्या त्रासाबद्दल तक्रार करणारे पत्र लिहितो/ लिहिते.

**किंवा**

**खाली दिलेल्या विषयावर वृत्तान्त लिहा :**

सरस्वती विद्यालय शिवाजीनगर, पुणे या शाळेत साजरा करण्यात आलेल्या स्वातंत्र्यदिन समारोहाचा वृत्तान्त लिहा.

**किंवा**

**खाली दिलेल्या विषयावर जाहिरात तयार करा :**

साड्यांच्या सेलची जाहिरात तयार करा.

*Best of Luck* 👍